महाराष्ट्र शासन.

क्रमांक : एसएसएन-१०९२/३१४१/माशि-१
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ डिसेंबर १९९२.

प्रति,

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

विषय:- १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबत. (इंग्रजी माध्यम)

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी, इंग्रजी माध्यमातून जून १९९२ पासून कायम विनाअनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

२. सदर संस्थांनी अनुदान संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यांत येत आहे.:-

अ) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे (उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

ब) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

क) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळांत शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (इ.बी.सी.च्या) फीच्या परताव्याची मागणी करण्यांत येणार नाही, अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीने लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

ड) सदर शाळांना प्रथम मान्यता देण्यापूर्वी संबंधित संस्थांकडून कायमस्वरुपी ठेव म्हणून रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त.) अनामत रक्कम शासनाकडे जमा करण्यांत यावी.

३. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थांबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थांना नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी :-

१) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

२). संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

४. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी. तसेच सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास त्वरीत पाठविण्यांत यावा.

(द.रा.माळी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना :-

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद.

मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

मा. शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

मा. शिक्षण उपमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.

सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक.

निवड नस्ती, माशि-१.

..३..

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |

**जिल्हा : रायगड.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६१. | कोकण एज्युकेशन सोसायटी अलिबाग. | पेण | आठवी | इंग्रजी |
| ६२. | कोकण एज्युकेशन सोसायटी अलिबाग. | रोहा | आठवी | इंग्रजी |
| ६३. | कोकण एज्युकेशन सोसायटी अलिबाग. | नागोठणे ता. रोहा | आठवी | इंग्रजी |
| ६४. | इंडियन एज्युकेशन सोसायटी सोसायटी, दादर, मुंबई. | कुरुळ, ता. अलिबाग | आठवी | इंग्रजी |
| ६५. | सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली. | कळंबोली ता. पनवेल. | आठवी | इंग्रजी |
| ६६. | इंडियन एज्युकेशन सोसायटी, दादर, मुंबई. | नागोठणे ता. रोहा. | आठवी | इंग्रजी |
| ६७. | रायगड मुस्लीम एज्युकेशन सोसायटी, म्हसळा. | म्हसळा. ता. म्हसळा. | आठवी | इंग्रजी |

**जिल्हा : कोल्हापूर.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६८. | नागनाथ एज्युकेशन सोसायटी, नरंदे, ता. हातकणंगले. | पन्हाळा, ता. पन्हाळा, | आठवी | इंग्रजी |
| ६९. | इंदिरा एज्युकेशन सोसायटी, ता. अर्जुननगर. | अर्जुननगर, ता. कागल. | आठवी. | इंग्रजी |
| ७०. | शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर. | मंगळवार पेठ कोल्हापूर. | आठवी | इंग्रजी |

xxxxxxxxxxxxxxx

| १. | २. | ३. | ४. | ५. |
|---|---|---|---|---|
| ४९. | भारतीय विद्याभवन जळगांव. | टाकेवाडीजवळ जळगांव. | आठवी | इंग्रजी |

## जिल्हा - पुणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५०. | आचार्य श्री. विजयवल्लभ राजस्थानी जैन विद्यालय ट्रस्ट, पुणे. | सॅलिसबरी पार्क, पुणे. | आठवी | इंग्रजी |
| ५१. | बाल ब्रम्हचारी [illegible] बुवा देवस्थान समाधी ट्रस्ट, पुणे. | गुलटेकडी, पुणे-३७. | आठवी | इंग्रजी |
| ५२. | जिज्ञासा प्रबोधन ट्रस्ट, बिबवेवाडी, पुणे. | बिबवेवाडी, पुणे-३७. | आठवी | इंग्रजी |
| ५३. | पी. ए. इनामदार एज्युकेशन ट्रस्ट, पुणे-१. | संगमवाडी, पुणे शहर. | आठवी | इंग्रजी |
| ५४. | पिपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई. | जय प्रकाश नगर येरवडा, पुणे-६. | आठवी | इंग्रजी |
| ५५. | रश्मी एज्युकेशन ट्रस्ट, आळंदी रोड, पुणे-६. | येरवडा, पुणे-६. | आठवी | इंग्रजी |
| ५६. | कॅम्प एज्युकेशन सोसायटी, पुणे. | सोलापूर बाजार पुणे. | आठवी | इंग्रजी. |
| ५७. | कॅम्प एज्युकेशन सोसायटी पुणे. | निगडी प्राधिकरण ता. हवेली. | आठवी | इंग्रजी |
| ५८. | रयत शिक्षण संस्था सातारा. | शिरूर ता. शिर ता. हवेली. | आठवी | इंग्रजी |
| ५९. | प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे. | शिवाजीनगर, पुणे. | आठवी | इंग्रजी |
| ६०. | न्यू मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, पुणे-७. | महादेवनगर मांजरी रोड. | आठवी | इंग्रजी |

Head Mistress

Headmistress
C.E.S.'s Utkarsha
English Medium High School
Pune-1.